लोकमत

# का महागली बॅडमिंटनची फुले?

क्रीडा विश्वातून



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

**बॅडमिंटनची नैसर्गिक फुलं ही बदकांच्या पिसांपासून बनवली जातात. अशा बदकांची मोठी पैदास चीनचे शेतकरी करत असायचे. परंतु, अचानक आंतरराष्ट्रीय बाजारात बदकांऐवजी वराह पालनाला अधिक उठाव असल्याचे लक्षात आल्यानंतर चीनच्या शेतकऱ्यांनी बदकांची पैदास थांबवली. परिणामी बदकांची पिसे मिळणे कठीण झाले. त्यातूनच त्यांचा पुरवठा आटला आणि शेवटी बॅडमिंटनच्या फुलांच्या किमतीत मोठी वाढ झाली.**



**देशातील एक** लोकप्रिय खेळ सध्या अडचणीत सापडला आहे. वाचून आश्चर्य वाटले ना? थांबा, या अडचणीचे कारण ऐकून तर, आश्चर्याचा मोठा धक्काच बसणार आहे. हा खेळ आहे बॅडमिंटन. क्रिकेटखालोखाल लोकप्रिय अशा बॅडमिंटनची शटल्स सध्या प्रचंड महाग झाल्यामुळे या खेळासमोर संकट उभे राहिले आहे. मार्च महिन्यात शटल्सच्या एका बॉक्सची म्हणजेच ट्यूबची किंमत साधारणपणे १५०० रुपये इतकी होती. त्याच बॉक्सची किंमत सध्या ३१०० रुपये इतकी वाढली आहे. शटल कॉक म्हणजे बॅडमिंटन खेळातील फूल, म्हणजेच या खेळाचा प्राण. या फुलांच्या किमतीत झालेली भाववाढ एवढी अफाट आहे की, त्यामुळे बॅडमिंटनच्या भविष्यातील विकासावर गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती अनेक बॅडमिंटनपटू व्यक्त करत आहेत. या फुलांच्या किमतीमध्ये एवढी वाढ का झाली, यामागचे कारण समजून घेऊ या.

बॅडमिंटन खेळाच्या उगमापासूनच नैसर्गिक पिसांपासून बनलेली फूल वापरली जात आहेत. त्यामुळेच सर्व स्तराच्या खेळाडूंची पहिली पसंती नैसर्गिक शटल्सनाच असते. नैसर्गिक शटल्सचा वेग आणि वजन लक्षात घेऊनच बॅडमिंटन खेळाचे तंत्र विकसित केल्यागेल्यामुळे व्यावसायिक खेळाडू नैसर्गिक पिसांपासून बनलेल्या फुलांवरच अवलंबून असतात. त्यातून ही नैसर्गिक फूलं इतके नाजूक असतात की, प्रत्येक सामन्याच्यावेळी किमान एक-दोन फूल नवीन घ्यावीच लागतात. थोडक्यात बॅडमिंटन शटल कॉकची मागणी प्रचंड असते. सध्याच्या घडीला बडमिंटनच्या शटलच्या किमतीमध्ये प्रचंड वाढ होऊनसुद्धा मागणीवर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. कारण, खेळ म्हणून बॅडमिंटनची लोकप्रियता वाढतच आहे. परंतु, शटलच्या किमती अशाच वाढत राहिल्या तर, मात्र भविष्यात बॅडमिंटन खेळापुढे आव्हान उभे राहू शकतं. या शक्यतेचा विचार करून नैसर्गिक फुलांऐवजी कृत्रिम फुलांच्या पर्यायावर ज्येष्ठ बॅडमिंटनपटू चर्चा करत आहेत.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे नैसर्गिक फुलांच्या वजनाएवढीच कृत्रिम पिसे बनविणे आता शक्य आहे. परंतु, त्यासाठी खेळाडूंच्या मानसिकतेमध्ये बदल करणे आवश्यक असल्याचे मत अनेक ज्येष्ठ बॅडमिंटनपटू व्यक्त करत आहेत. अर्थशास्त्राच्या नियमांनुसार मागणी वाढली, तर किमती कमी होतात. पण, बॅडमिंटनच्या फुलांची मागणी वाढूनसुद्धा किमती वाढतच आहेत. यामागचे कारण म्हणजे, मागणी एवढा पुरवठा नसल्यामुळेच फुलांचा तुटवडा सध्या निर्माण झाला आहे आणि त्यामुळे फुलांच्या किमतीत वाढ झाली आहे.

बॅडमिंटनच्या फुलांचा तुटवडा का झाला, यामागचे कारण अधिक धक्कादायक आहे. बॅडमिंटनची नैसर्गिक फूलं ही बदकांच्या पिसांपासून बनवली जातात. अशा बदकांची मोठी पैदास चीनचे शेतकरी करत असायचे. परंतु, अचानकपणे आंतरराष्ट्रीय बाजारात बदकांऐवजी वराह पालनाला अधिक उठाव असल्याचे लक्षात आल्यानंतर चीनच्या शेतकऱ्यांनी बदकांची पैदास थांबवली आणि परिणामी बदकांची पिसे मिळणे कठीण झाले. त्यातूनच त्यांचा पुरवठा आटला आणि शेवटी बॅडमिंटनच्या फुलांच्या किमतीत मोठी वाढ झाली. जवळपास प्रत्येक खेळामध्ये हीच गंमत असते. ही गंमत म्हणजे, आपण विचार करू शकत नाही, इतक्या खोलवर प्रत्येक खेळाची मुळे रोवलेली असतात. अगदी क्रिकेटचे बॅट-चेंडू, टेनिसचे चेंडू तसेच विविध प्रकारच्या क्रीडा साहित्य निर्मितीमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग असतो आणि जर अशा शेतीविषयक मुद्द्यांवर परिणाम झाला, तर त्याची झळ क्रीडाविश्वावरही पडत असते.